पुणे पोलीस
Pune Police

जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक -१४ दिनांक - ०४/०१/२०२४**

चंदननगर पोलीस स्टेशन, पुणे शहर

## रिक्षामध्ये गहाळ झालेले सोन्याचे दागिने तांत्रिक विश्लेषणव्दारे रिक्षा चालकाचा शोध घेऊन फिर्यादीस परत मिळवुन दिलेबाबत..

यातील फिर्यादी महिला हया दि.२८/१२/२०२३ रोजी सणसवाडी,पुणे येथुन चंदननगर येथे येण्याकरीता रिक्षाने प्रवास करून,मुंढवा खराडी बायपास रोडवर रिलायन्स मार्ट येथे उतरल्यानंतर तेथुन थोडे पुढे चालत गेल्यानंतर त्यांचे लक्षात आले की,त्यांचेकडील कपडे व सोन्याचे दागिने असलेली बॅग रिक्षामध्येच राहीली आहे. फिर्यादी हया परत रिलायन्स मार्ट चौक येथे आले असता,तो पर्यंत रिक्षाचालक हा निघुन गेला होता. त्यांनी रिक्षाचा आजु-बाजुस शोध घेतला.परंतु सदरची रिक्षा मिळुन आली नाही.त्यामुळे त्यांनी सदर प्रकाराबाबत चंदननगर पोलीस स्टेशन येथे येऊन पोलीस अंमलदार,आव्हाड, कोद्रे व सैय्यद यांनी सांगितला. त्यांनी तात्काळ रिलायन्स मार्ट चौक व आजुबाजुचे रिक्षाचा नंबर प्राप्त करुन,सदर नंबरचे आधारे मिळालेल्या माहिती नुसार तांत्रिक विश्लेषणावरुन रिक्षा चालक याचा शोध घेऊन,त्याचेकडील फिर्यादी महिला यांची कपड्याची बॅग व सुमारे २ लाख रुपये किमतीचे सोन्याचे दागिने परत मिळवुन दिले आहे. याबाबत फिर्यादी यांनी पोलीसांचे आभार मानले आहे.

सदरची कामगिरी ही मा.अपर पोलीस आयुक्त,पूर्व प्रादेशिक विभाग,पुणे शहर,श्री.रंजन कुमार शर्मा, मा.पोलीस उप आयुक्त,परि-४,पुणे शहर,श्री. शशिकांत बोराटे,मा.सहाय्यक पोलीस आयुक्त,येरवडा विभाग,पुणे,श्री.संजय पाटील यांचे मार्गदर्शनाखाली व चंदननगर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्री. राजेंद्र लांडगे, पोलीस निरीक्षक,(गुन्हे),श्रीमती.मनिषा पाटील,सहा.पोलीस निरीक्षक, प्रशांत माने व पोलीस अंमलदार, सुभाष आव्हाड,श्रीकांत कोद्रे, दिलावर सय्यद,श्रीकांत शेंडे, अविनाश संकपाळ, महेश नानेकर, विकास कदम यांनी केलेली आहे.